पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 18/11/2019 (सोमवार)
(सकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर कारगाव रेल्वे क्रासिंग येथे दिनांक 17/11/2019 चे 03.00 वा. ते 03:30 वा. दरम्यान भिवापुर पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन भिवापुर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एमएच– 34/बिजी– 4076 क्रमांकाच्या वाहनाला थांबविले. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये एकुण 39 गाई त्यापैकी 2 जनावरे मृत अवस्थेत मिळुन आले. दरम्यान अंधराचा फायदा घेऊन आरोपी क्र. 1) सलिम शेख, 2) जितेन्द्र पाकमोडे हे दोघेही फरार झाले तर आरोपी क्र. 3) राहुल शामराव बाळबुधे, वय 24 वर्ष, रा. गेवर्धा ता. कुरखेडा, जि. गडचिरोली याला अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीच्या ताब्यातुन 37 जनावरे व वाहनासह एकुण किंमती 23,90,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस निरीक्षक श्री महेश भोरटेकर, पो.स्टे. भिवापुर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11(1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ)(1),9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 83/177, 132/177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. 3 ला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री महेश भोरटेकर हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावर मौजा खात भंडारा रोड, ता. मौदा जि. भंडारा येथे दिनांक 17/11/2019 चे 11.00 वा. ते 12:15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ग्यानिराम गिरीपुजे, वय 59 वर्ष, रा. खात भंडारा यांच्या घराच्या दाराचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरात ठेवलेले कपाटामधील सोन्या–चांदीचे दागिने कि. 74,000/–रू. व एचएमटी कंपनीची हात घडी कि. 1,000/–रू. एकुण कि. 75,000/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपी विरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि चाबुकस्वार 8208544361 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर